# प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६
फोन नं. ०२०-२६६८५०००


जा.क्र./पोउआ/वाह/ ८०७ /२०२५ पुणे दिनांक - ०७/०२/२०२५

पुणे शहरातील विमाननगर वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, विमान नगर वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. "सदर ठिकाणी यापुर्वी काही पार्किंग संदर्भात आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे".

## विमाननगर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

- **फिनिक्स मॉल (विमाननगर चौक/जंक्शन) ते सोमनाथ नगर चौक दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात गोलाकार पद्धतीने वाहतुकीत खालील प्रमाणे बदल करण्याकरीता विमाननगर चौक/जंक्शन हे प्रायोगिक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात येत आहे.**
- **विमाननगर मधुन पुणे कडे जाणारे वाहनांनी विमाननगर चौकातुन डावीकडे वळन घेवुन सोमनाथ नगर चौक येथुन यु टर्न घेवुन इच्छितस्थळी जावे.**
- **नगर कडून पुणे कडे येणारी व विमाननगर फिनिक्स मॉल कडे जाणारे वाहनांनी अग्निबाज गेट समोरुन यु टर्न घेवुन इच्छितस्थळी जावे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ ऐअरपोर्ट रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक -01 /02/२०२५ ते दिनांक -15/02/२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक पुणे शहर (शिक्का)

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक पुणे शहर

प्रति,

१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
  २/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३, पुणे शहर.

३) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
  २/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) प्रभारी अधिकारी भारती विद्यापीठ वाहतुक विभाग, पुणे शहर.
  २/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.

५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर
  २/- सादर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

६) पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर
  २/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.